Indian Streams Research Journal
Vol - I , ISSUE - IX October 2011 ISSN:-2230-7850

# महाराष्ट्राची अर्थव्यवस्था : विविध पैलू

**प्रा.मोहोकार हरिहर शिवदास**
राजीव गांधी महाविद्यालय , मुदखेड जि.नांदेड.

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र राज्य हे कृषी, उद्योग व सेवाक्षेत्रात अग्रेसर असणारे राज्य आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतून निर्माण झालेले महाराष्ट्र राज्य हे १ मे १९६० पासून सतत विकास करीत आहे. त्यामूळेच भारतात महाराष्ट्र राज्याचे एक वेगळे स्थान निर्माण झाले आहे. महाराष्ट्रातील औद्योगिक प्रगती, जैविक विविधता, मणुष्यबळ, पायाभूत सुविधा, कृषीक्षेत्र, दुग्धव्यवसाय, खाणक्षेत्र हे राज्याचे बलस्थाने ठरले आहे. देशात प्रगत म्हणून ओळखला जाणारा महाराष्ट्र आज अनेक आघाड्यावर संकटांशी सामना करीत आहे. उदा.विदर्भ व मराठवाड्यात सतत दुष्काळी परिस्थिती निर्माण होत असल्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येत वाढ होतांना दिसून येते. तसेच वाढत्या बकाल वस्त्या, बेरोजगारांचे वाढते प्रमाणे, घटते स्त्री-पुरुष प्रमाण, भ्रष्ट नोकरशाही, निकृष्ठ सामाजिक विकास, कुपोषणाचा प्रश्न इत्यादी सारख्या संकटांनी महाराष्ट्राला घेरले आहे. महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेतील विविध पैलूवर वरिल सर्व समस्यांचा प्रभाव पडून आज महाराष्ट्राच्या विकासात अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. या समस्यांना तोंड देत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था वाटचाल करीत आहे. अशा महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचे विविध पैलू अभ्यासण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे.

**१.नागरीकरणात वेगाने वाढ :**

आर्थिक विकासामध्ये वाढत्या नागरीकरणाचा मोठा हिस्सा असतो. वाढत्या नागरीकरणामुळेच महाराष्ट्राचा वेगाने विकास होतांना आढळून येतो. सन १९८१ मध्ये राज्यातील नागरिकरणाचे प्रमाण ३५.३ टक्के होते. सन १९९१ मध्ये ३८.७ टक्के होते. २००१ मध्ये ४२.४ टक्के झाले. तर २०१० मध्ये हे प्रमाण ४४.४२ टक्के इतके झालेले आढळुन येते. १९८१ यावर्षी १ लाख व त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असणारी राज्यात २९ शहरे होती. २००१ मध्ये त्यांची संख्या ४० इतकी झाली. तसेच नागपूर, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती अशा अनेक शहराचा विकास झपाट्याने होत आहे.

**२.कृषी क्षेत्राचा मोठा आकार :**

राज्याच्या अर्थव्यवस्थेत उद्योग व सेवा क्षेत्राचे प्राबल्य निर्माण झालेले असले तरी कृषी व सलग्न क्षेत्राचा राज्यातील उत्पन्नात हिस्सा १२.४ टक्के आहे. राज्यातील एकूण रोजगारापैकी ५५ टक्के रोजगार कृषी क्षेत्र उपलब्ध करीत आहे. देशातील एकुण लागवडी खालील क्षेत्र १९५१ लाख हेक्टर्स आहे. त्यापैकी २२६ लाख हेक्टर्स म्हणजेच १२ टक्के लागवडी खालील क्षेत्र महाराष्ट्र राज्याचे आहे. देशाच्या एकुण सिंचन क्षेत्रात राज्याच्या सिंचन क्षेत्राचा वाटा १८ टक्के एवढा आहे.

सन २००९-१० या वर्षात देशाचे दरडोई धाण्याचे उत्पादन १८७ कि.ग्रॅ. तर राज्याचे ११४ कि.ग्रॅ. आहे. देशात प्रति शेतकरी निव्वळ प्रेरणी क्षेत्राची एकुण भौगोलीक क्षेत्राशी टक्केवारी ४२.६० टक्के आहे तर तीच टक्केवारी राज्याची ५६.५० टक्के आहे.

**३.पर्यावरण असमतोल :**

केंद्रीय नियोजन मंडळ, माधव गोखले अभ्यास अहवाल इ. अनेकांच्या अभ्यासावरुन महाराष्ट्रात हवा पाणी, जमीन, अन्न इत्यादीमध्ये होणारे प्रदुषण हे नैसर्गिक संपदा व जैविक विविधता टिकविण्यासाठी धोकादायक आहे. विकास प्रक्रियेत महाराष्ट्रात फार मोठ्या प्रमाणात नैसर्गिक साधन सामुग्रीची हानी होत आहे. पाण्याच्या अनियोजित वापर, वाढते शहरीकरण, कचऱ्यांची समस्या, सांडपाण्याची समस्या, अपघाताचे वाढते प्रमाण, जैविक कचरा, हरितवायू उत्सर्जन, पाणी पातळीत घट इत्यादी सारख्या पर्यावरणीय समस्या महाराष्ट्राच्या भविष्यातील प्रगतीला अडसर ठरणाऱ्या आहेत. म्हणून भविष्यातील प्रगतीवरील पर्यावरण ऱ्हासाचा परिणाम दूर करण्यासाठी पर्यावरण जनजागृती व पर्यावरण नियंत्रणात्मक उपाययोजना करणे आवश्यक ठरते. त्यासाठी स्वयंसेवी संस्था विद्यार्थी, युवक, युवती, महिला, जेष्ठ नागरीक इत्यादीनी पर्यावरण चळवळीशी सक्रिय होणे आवश्यक आहे.

**४.महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्था :**

देशाची लोकसंख्या म्हणजे देशाचे मुनष्यबळ, गुणवत्ता पुर्ण मनुष्यबळ देशाच्या विकासासाठी महत्वाचे ठरते. मनुष्यबळाचा विकास आरोग्यासाठी, शिक्षणासाठी, विकासासाठी, समाज निर्मितीसाठी, उपयोगी ठरतो. देशपातळीवर आरोग्यावर सरासरी खर्च २००९ पर्यत जीडीपीच्या २ टक्के ते २ टक्के वाढविण्याचे सरकारने निश्चित केले. २००९ यावर्षी महाराष्ट्राचा आरोग्य क्षेत्रावरील खर्च २३०० कोटी रुपयाचा आहे. जागतिकीकरणाच्या लाटेत राज्यात आरोग्य सेवांवरील शासकिय खर्च कमी होत आहे. राज्याची लोकसंख्या ज्या प्रमाणात वाढत आहे. त्या प्रमाणात डॉक्टरांची संख्या, परिचारीकांची संख्या, हॉस्पीटल्स, वैधकिय साहित्य इत्यादीची उपलब्धता वाढत नसल्याचे चित्र आढळुन येते. तसेच आजही स्वच्छता गृह, पिण्याचे स्वच्छ पाणी इत्यादी बाबत शहरी व ग्रामीण भागात विदारक चित्र आढळुन येते.

**५.राष्ट्रीय उत्पन्नात मोठा हिस्सा :**

राष्ट्रीय उत्पन्न वाढल असणे हे आर्थिक विकासाचे लक्षण मानले जाते. चालू किंमतीनुसार २०१० मध्ये देशाचे एकुण उत्पन्न ६५,२५,०३८/- कोटी इतके होते तर महाराष्ट्र राज्याचे एकुणउत्पन्न ९,१५,४७२/- कोटी इतके होते. यावरुन स्पष्ट होते की, देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात राज्याचा १५.५ टक्के एवढा मोठा वाटा आहे. याच काळात देशाचे वार्षिक प्रतिव्यक्ति उत्पन्न ५२३५१ होते तर राज्यातील प्रतिव्यक्ति उत्पन्न ८६३८६ एवढे होते. दरडोई वार्षिक उत्पन्नाच्याबाबतीत महाराष्ट्राचा गोवा, दिल्ली, सिक्कीम व हरियाणा नंतर पाचवा क्रमांक लागतो परंतु ही सर्व राज्य लोकसंख्येच्या दृष्टीकोणातून लहान आहेत.

**६.सर्वात जास्त आर्थिक क्षेत्र :**

देशात येणाऱ्या एकुण विशेष आर्थिक क्षेत्रापैकी ४० टक्के विशेष आर्थिक क्षेत्र एकट्या महाराष्ट्रात निर्माण होणार आहे. ३० नोव्हेंबर २०१० पर्यंत राज्यात २१० प्रस्ताव आलेले आहेत. त्यापैकी ९३ प्रस्ताव केंद्रसरकारकडून मान्य झालेले आहेत. राज्यात एकूण ६४ सेझ अनुसूचित झालेले असून १७ सेझ कार्यान्वीत झाले आहे. त्यामुळे या सेझच्या माध्यमातून भविष्यात ९ लाख नवीन रोजगार निर्माण होऊन राज्यातील रोजगाराची समस्या सुटण्यास मदत होणार आहे.

**७.वाढती सहकारी चळवळ :**

महाराष्ट्र हे सहकारी चळवळीबाबत आघाडीचे राज्य असून शेतकरी व शेतीसाठी सहकारी संस्थांनी मोठे योगदान दिले आहे. सहकारी बँक, खरेदी विक्री संघ, दुग्ध संघ, गृहनिर्माण संस्था, ग्राहक संघ, साखर कारखाने इत्यादीमुळे शहरी व ग्रामीण भागाच्या विकासाला चालना मिळाली आहे. तसेच सहकारी चळवळीमूळे राज्यात आर्थिक, सामाजिक व राजकिय विकासाला मोठ्या प्रमाणात चालना मिळाली आहे. राज्यातील सहकारी चळवळीचा विकास करण्यामध्ये पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील, यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, तात्यासाहेब कोरे, शरद पवार इत्यादीचे महत्त्वाचे योगदान आहे.

**८.घटते स्त्री-पुरुष प्रमाण :**

पुरोगामी महाराष्ट्रात महिलांसाठी आरक्षण आणि महिलांचे सबलीकरण याबाबत जोरदार चर्चा आणि काही अंशी प्रयत्न होत असतांना दुसरीकडे राज्यातील एकुण लोकसंख्येतील स्त्री-पुरुष प्रमाण लक्षणीयरीत्या कमी होत असल्याचे दिसून येत आहे. १९९१ मध्ये ० ते ६ वयोगटात एक हजार मुलांमागे ९४६ मुली होत्या. २००१ मध्ये हे प्रमाण ८८३ पर्यन्त घटले २००१ ते २०११ याकाळात राज्यात ४ लाख ६८ हजार स्त्रीभ्रुणहत्या झाल्या हे विदारक सत्य आहे.

राज्यातील पश्चिम महाराष्ट्रातील सधन समजल्या जाणाऱ्या जिल्ह्यामध्ये पुणे (९०६), सातारा (८८४), कोल्हापूर (८४५), सोलापूर (८९७) स्त्री-पुरुष प्रमाण होते. पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे घटते प्रमाण हे भविष्यातील अनेक संकटांची चाहूल आहे. कारण विवाहासाठी मुलीची कमतरता भासल्यास महिलावर होणाऱ्या बलात्कारात वाढ होईल तसेच बहुपतित्व प्रथा निर्माण होऊ शकते. म्हणून पुरोगामी महाराष्ट्रात मुलीच्या जन्माचे स्वागत व्हावे आणि मुलीची संख्या वाढावी म्हणून महाराष्ट्र सरकारने मुलीसाठी अनेक योजना सुरु केल्या आहेत. त्यामध्ये मुलींना मोफत शिक्षण, शिक्षणाच्या ठिकाणी जाण्या-येण्यासाठी मोफत प्रवास, मुलींना गुणवत्ता शिष्यवृत्ती सुरु केली आहे. त्यामुळे आज समाजात मुलींच्या जन्माचे स्वागतच केले जात आहे.

**९. शैक्षणिक प्रगती :**

स्वातंत्र्यपूर्वी राज्यात शिक्षण प्रसाराची बीजे समाजसुधारकांनी रोवली परंतु साक्षरतेचा उच्चदर, मुलीच्या शिक्षणाचा वाढता सहभाग, शैक्षणिक गळतीचे उच्च प्रमाण, उच्च शिक्षणापासून अनेक वंचीतअशी सध्या शिक्षणाची राज्यात स्थिती आहे. महाराष्ट्राच्या

स्थापनेपासून महाराष्ट्रात प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रीकरणावरभर दिला आहे. १९६१ मध्ये राज्यात साक्षरतेचा दर ३५.०८ टक्के एवढा होता. त्यामध्ये वाढ होऊन २००१ मध्ये हा दर ७७.२७ टक्के एवढा झाला तर २०११ च्या जनगणनेनुसार हा दर ८२ टक्के एवढा आहे. शैक्षणिक दृष्ट्या महाराष्ट्राची प्रगती उल्लेखनीय असली तरी मराठवाडा आणि विदर्भातील काही जिल्हे शैक्षणिक दृष्ट्या आजही मागासलेलेच आहेत.

**१०.मानव विकास निर्देशांक :**

मानव विकासात साक्षरता, आयुर्मान व दरडोई उत्पन्न या घटकांचा विचार करुन राज्यातील मानव विकास निर्देशांक तयार केला जातो. मानव विकास निर्देशांकावरुन समाजातील आर्थिक व सामाजिक प्रगतीचा अंदाज बांधता येतो. सन २००१ मध्ये मानव विकास निर्देशांकाच्या बबतीत राज्याचा दुसरा क्रमांक होता तर २०११ मध्ये राज्याचा क्रमांक घसरुन पाचवा झालेला आहे. मानव विकास ही अशी एक प्रक्रिया आहे ज्याद्वारे लोकाच्या गरजा, आवडीनिवडी, आरोग्य दायी जीवन, शिक्षण सुविधा, राहणीमान इत्यादी घटक कळून येतात व भविष्यात या घटकात सुधारणा करण्यासाठी राज्य प्रयत्नशील राहतो व त्यामुळे राज्यातील मानवाचा विकास साध्य होतो ही यामागील भुमिका आहे.

**निष्कर्ष :**

संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर महाराष्ट्राने विविध क्षेत्रात प्रगती करण्यासाठी प्रयत्न केले आज शेती, उद्योग, सेवाक्षेत्र, पर्यटन, तंत्रज्ञान.इ. क्षेत्रात मोठ्या प्रमाणात प्रगती झाली आहे. परंतु १९९१ नंतर देशात आलेल्या जागतिकीकरणामुळे राज्यात अनेक समस्या व आव्हाणे निर्माण झाली. जसे स्त्रियावरील वाढते अत्याचार, वाढती गुन्हेगारी, वाढते कुपोषण, शेतकरी आत्महत्या, कृषी क्षेत्रातील मंदी, अपघाताचे वाढते प्रमाण, इत्यादी मुळे राज्याच्या विकासात अडथळे निर्माण झाले आहे. म्हणून महाराष्ट्राच्या विकासासाठी व भवितव्यासाठी राज्यकर्ते, धोरणकर्ते, सामाजिक विचारवंत, डॉक्टर्स शिक्षक व सर्वसामान्य नागरीक यांची भुमिका महत्त्वाची ठरणार आहे.

**संदर्भ सूची :**

१.शिंदे जगन्नाथ, कृषी अर्थसहाय्य योजना, गोदावरी पब्लिकेश, नाशिक (२००७)
२.कुरुलकर र.पु, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, विद्या प्रकाशन, नागपुर (२००६)
३.रा.सु. साळूंके, महाराष्ट्रातील नागरीकरण प्रवृत्ती, कारणे, परिणाम, आव्हाणे, अर्थसंवाद, जून २००८, खंड ३२, अंक-१.
४.डॉ.अ.रा.सोळूंके, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, कैलास प्रकाशन, औरंगाबाद (२००२)
५.महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०१०, २०११.